# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक ३३) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) बुधवार, दि.२१ जानेवारी २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितिन नोबीन यांनी स्वीकारला पदभार

नवी दिल्ली दि.२० (वृत्तसंस्था)- नितीन नबीन यांनी आज भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला. नवी दिल्लीत भाजपाच्या मुख्यालयात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत संघटन पर्व या कार्यक्रमात नबीन यांनी सूत्रं स्वीकारली. राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी नबीन यांचा एकट्याचाच अर्ज आला होता. आज संघटन पर्व या कार्यक्रमात निवडणूक निर्णय अधिकारी के. लक्ष्मण यांनी पक्षाचे १२वे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितीन नबीन यांचं नाव जाहीर केलं. नितीन नबीन हे भाजपाचे आतापर्यंतचे सर्वात तरुण अध्यक्ष ठरले आहेत.

प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी नितीन नबीन यांचं भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन केलं. नितीन नबीन यांच्यावर केवळ पक्षाचीच नाही तर रालोआ मधे समन्वय साधण्याची जबाबदारी आहे, नबीन हे देशात राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन पाहणाऱ्या पिढीतले आहेत. याचा फायदा कार्यकर्त्यांना होईल, असं मोदी म्हणाले.

# महाराष्ट्र भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## दावोसमध्ये पहिल्याच दिवशी १४ लाख ५० हजार कोटी गुंतवणुकींचे १९ सामंजस्य करार

दावोस -दि.२० (वृत्तसंस्था)- भारतातील उद्योग आणि गुंतवणूक क्षेत्रासाठी महाराष्ट्रच गेटवे-ऑफ-इंडिया' असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधान खरे ठरवणारे तब्बल १४ लाख ५० हजार कोटींचे गुंतवणूक करार पहिल्याच दिवशी करण्यात आले. या गुंतवणुकीसोबतच राज्यात १५ लाख रोजगार संधी निर्माण होणार आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाच्या माध्यमातून यंदा विविध विभागांनी आणि विविध क्षेत्रातील उद्योगांच्या प्रतिनिधी समवेत मुख्यमंत्री श्री. फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

रित ऊर्जा, अन्न प्रक्रिया, पोलाद निर्मिती, आयटी-आयटीईस, डाटा सेंटर्सह ईव्ही- ऑटोमोबाईल, जहाज बांधणी, डिजिटल इन्फ्रा अशा विविध क्षेत्रातील ही गुंतवणूक मुंबईसह राज्याच्या रत्नागिरी, पालघर, गडचिरोली, अहिल्यानगर या भागात पोहोचणार असल्याने, तेथे उद्योग वाढीसह मोठ्या प्रमाणा रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्यासह महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाचे प्रतिनिधीमंडळ दावोस येथे उपस्थित आहे. दावोस मधील पहिल्याच दिवसापासून जगभरातील विविध क्षेत्रातील उद्योगांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी स्वारस्य दर्शवणे सुरु केले. यातून गुंतवणुकीचा मोठा ओघ सुरु झाल्याने महाराष्ट्र पॅव्हेलियनमध्ये उत्साहाचे चित्र निर्माण झाले.

तत्पूर्वी, दावोस मधील महाराष्ट्र पॅव्हेलियनचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले.' भविष्याचे वेध घेण्यासाठी सज्ज, विश्वासार्ह आणि दीर्घकाळचा भागीदार म्हणून महाराष्ट्र स्वागत करीत आहे. भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस म्हणून महाराष्ट्र जगाला, उद्योग विश्वाला साद घालत आहे, अशी मनोदय भावनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केली.

सामंजस्य करारांवरील स्वाक्षरी व करारांच्या आदान-प्रदान प्रसंगी झालेल्या चर्चेत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, 'महाराष्ट्रावरील उद्योग क्षेत्राचा, गुंतवणुकदारांचा हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी आम्ही सदैव सज्ज आहोत. येथे होणाऱ्या करारांवरील पुढील कार्यवाहीबाबत वॉर रूमच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येईल. उद्योजकांना आवश्यक सुविधा वेळेत आणि दर्जदार पद्धतीने मिळाव्यात याची काळजी घेतली जाईल, असेही त्यांनी सांगितले. 'उद्योजक गुंतवणूकदारांकडून मिळत असलेला प्रतिसाद पाहता, यंदा गतवर्षीहून अधिक गुंतवणूक आणि रोजगार संधीचे सामंजस्य करार होतील असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. विशेषतः मुंबईतील घन कचरा व्यवस्थापन, हवा आणि पाणी गुण




संनियत्रणाच्या माध्यमातून सर्क्युलर ईकॉनॉमीची संरचना उभी केली जात आहे. तसेच महाराष्ट्र हे अमर्याद संधीचे राज्य आहे. त्याबाबत आणि एमएमआर क्षेत्राच्या विकासासह, तिसऱ्या मुंबईच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र आर्थिक सल्लागार समितीने आराखडा निश्चित करून दिला आहे. या माध्यमातून व्यवसायाच्या आणि चांगल्या पगाराच्या रोजगार निर्मितीवर भर दिला जात असल्याचेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणाले.

दरम्यान, आगामी दोन दिवसात दावोसमध्ये एआय़, क्वांटम कंम्प्युटींग, डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर, यांसह फिनटेक, लॉजिस्टिक्स अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर तसेच जहाज बांधणी, ईव्ही, अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील आणखी काही उद्योग घटकांशीही गुंतवणुकीचे सामंजस्य करार होणार आहेत. त्यादृष्टीने त्यांच्या प्रतिनिधींशी, बोलणी -चर्चांच्या फेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत.

## मुंबईत भाजपचा महापौर बसण्याचा मुहूर्त ठरला, ३० जानेवारीला शपथविधी कार्यक्रमाच्या हालचाली

मुंबई दि.२० (प्रतिनिधी)- मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या भाजपने आता आपला महापौर बसवण्याचा मुहूर्त निश्चित केला आहे. त्यानुसार येत्या ३० जानेवारीला मुंबई महानगरपालिकेत भाजपचा महापौर कारभाराची सूत्रे हातात घेणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. भाजपचे नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन हे मंगळवारी आपला पदभार स्वीकारणार आहेत. यानिमित्ताने भाजपचे मुंबई आणि महाराष्ट्रातील नेते सध्या दिल्लीत आहेत. याच नेत्यांच्या गोटातून येत्या ३० तारखेला भाजपचा महापौर मुंबईची सूत्रे हातात घेणार असल्याची माहिती समोर आली आहे.

यंदाच्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपचे ८९ नगरसेवक निवडून आले होते. बहुमतासाठी ११४ नगरसेवकांचे संख्याबळ गरजेचे असल्याने भाजपला एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या २९ नगरसेवकांची गरज आहे. मात्र, भाजपची गरज ओळखून शिंदेंच्या शिवसेनेकडून दबावतंत्राचा वापर केला जात आहे. एकनाथ शिंदे यांनी भाजपकडे पहिल्या अडीच वर्षांसाठी मुंबईचे महापौरपद आणि स्थायी व बेस्ट समितीत योग्य वाटा मागितल्याची चर्चा आहे. मात्र, भाजपच्या दिल्लीतील नेतृत्त्वाने शिवसेनेच्या दबावतंत्राला बळी पडणार नसल्याचा स्पष्ट संदेश दिला आहे. मुंबईच्या महापौर पदासाठी भाजपने दीर्घकाळ प्रतीक्षा केली आहे. त्यामुळे यंदा महापौर पदाबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, हे मित्रपक्षांना समजावून सांगा, असा संदेश भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवला होता. यानंतर काहीवेळातच दिल्लीतील भाजप नेत्यांच्या गोटातून येत्या ३० जानेवारीला भाजप मुंबई महानगरपालिकेत आपला महापौर बसवून राज्यरोहण करेल, अशी माहिती समोर आली आहे.

## एकनाथ शिंदे आणि अजित पवारांचा गेम भाजपाच करणार, नाना पटोलेंचे वक्तव्य चर्चेत

मुंबई दि.२० (प्रतिनिधी)- मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत भाजपा आणि शिंदे सेनेच्या युतीला मोठं यश मिळालं. मात्र, त्यानंतर आता मुंबई महापालिकेच्या महापौर पदावरून मोठ्या घडामोडी सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांच्या सर्व नगरसेवकांना मुंबईतील एका पंचतारांकीत हॉटेलमध्ये ठेवलं. त्यामुळे शिंदे यांनी भाजपाकडे अडीच वर्षे महापौरपदाचा प्रस्ताव ठेवल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

मुंबई महापालिकेच्या महापौर पदावरून सुरू असलेल्या घडामोडींवर बोलताना काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी मोठं भाष्य केलं आहे. ''एकनाथ शिंदे आणि अजित पवारांचा गेम भाजपाच करणार'', असं वक्तव्य नाना पटोले यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केलं आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीनंतर 'हॉटेल पॉलिटिक्स' सुरू आहे. एकनाथ शिंदे यांना त्यांचे नगरसेवक फुटण्याची भिती आहे असं वाटतं का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. यावर बोलताना नाना पटोले म्हणाले की, ''आम्ही मागेच म्हटलं होतं की अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांचा गेम भाजपा करणार. आता अजून खूप घडामोडी घडतील. सध्या आपल्या राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस हे दावोस दौऱ्यावर आहेत. यातच सध्या दिल्लीवरून मुख्यमंत्री फडणवीसांना आदेश सुरू आहेत की मुंबईत भाजपाचाच महापौर होईल आणि त्यामध्ये कोणाचंही ऐकलं जाणार नाही वैगेरे, अशा बातम्या मी पाहत आहे. पण अजून मोठे गेम होणार आहेत'', असं नाना पटोले यांनी म्हटलं आहे. ''महाराष्ट्राच्या राजकारणात येत्या आठ दिवसांत खूप मोठे उलटफेर होणार आहेत. मी तुम्हाला हे देखील सांगतो की महाराष्ट्रातील जनतेला काँग्रेसचीच सत्ता पाहिजे असं वातावरण आहे. फक्त यांनी बॅलेटवर मतदान घ्यावं. मग लोक बरोबर करतील'', असं नाना पटोले यांनी म्हटलं आहे.

## भारत आणि यूएईत अनेक महत्त्वपूर्ण करारावर स्वाक्षऱ्या

नवी दिल्ली दि.२० (वृत्तसंस्था)- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांच्याशी शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा केली. या बैठकीदरम्यान, भारत आणि यूएई यांच्यात संरक्षण, अंतराळ, ऊर्जा, सुपरकंप्यूटिंग आणि अन्न सुरक्षा या क्षेत्रांमध्ये अनेक करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या बैठकीनंतर माध्यमांना माहिती देताना परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री म्हणाले की, सामरिक संरक्षण भागीदारी,अंतराळ क्षेत्र आणि त्याच्या व्यापारीकरणासाठीच्या करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यूएईनं भारतात सुपरकंप्यूटिंग क्लस्टरच्या स्थापनेसाठी सहमती दर्शवली आहे. ते म्हणाले की, २०३२ पर्यंत द्विपक्षीय व्यापार दुप्पट करून दोनशे अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्यासही या बैठकीत सहमती दर्शवली आहे. तसंच दोन्ही नेत्यांनी सर्व प्रकारच्या दहशतवादाचा निषेध केला. दहशतवादी कृत्यांना वित्तपुरवठा करणाऱ्या, त्यांना पाठिंबा देणाऱ्या किंवा ती कृत्ये करणाऱ्यांना कोणत्याही देशानं आश्रय देऊ नये, यावर दोन्ही नेत्यांनी भर दिला, असं विक्रम मिस्त्री यांनी सांगितलं.

## महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी आज सुनावणी

बेळगाव दि.२० (वृत्तसंस्था)- महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी अखेर आठ वर्षांनंतर बुधवारी (दि. २१) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. या दिवशी मूळ दाव्यावर सुनावणी होईल. त्याकडे सीमावासीयांचे लक्ष लागून आहे.

सीमाप्रश्नी महाराष्ट्राच्या वतीने दावा मेन्शन करण्यात आला होता. वरिष्ठ विधिज्ज्ञ अॅड. सी. एस. वैद्यनाथन आणि अॅडव्होकेट ऑन रेकॉर्ड शिवाजी जाधव यांनी सर्वोच्च न्यायालयात सीमाप्रश्नी लवकरात लवकर सुनावणी व्हावी, अशी विनंती केली होती. न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती आलोक आराध्ये यांनी ही विनंती मान्य करून बुधवारी सुनावणी निश्चित केली आहे. या दिवशी मूळ दाव्यावरच सुनावणी होण्याची शक्यता आहे.

अनेक लढे, आंदोलने करूनही न्याय मिळत नसल्यामुळे २००४ मध्ये महाराष्ट्र सरकारने सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयात दाखल केला आहे. यामध्ये केंद्र सरकार प्रतिवादी क्रमांक एक असून कर्नाटक सरकार प्रतिवादी क्रमांक दोन आहे. सुरवातीपासूनच दोन्ही प्रतिवादींनी या दाव्यात वेळकाढूपणा केला आहे. २०१३ मध्ये या याचिकेवर साक्षी, पुरावे तपासणे आणि वादाचे मुद्दे निश्चित करण्यासाठी कोर्ट कमिशनची नियुक्ती करण्यात आली. तर न्यायालयात कर्नाटकाने फेरविचार याचिका दाखल करत पुन्हा वेळकाढूपणा केला आहे. २०१७ मध्ये शेवटची सुनावणी झाली होती. त्यावेळी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे विधिज्ज्ञ अॅड. हरिष साळवे यांनी महाराष्ट्राची बाजू मांडली होती. आगामी सुनावणीलाही त्यांची नियुक्ती करावी, यासाठी मध्यवर्ती समितीतर्फे प्रयत्न करण्यात येत आहेत. उच्चाधिकार समितीची बैठक व्हावी, यासाठीही पत्रकार व्यवहार करण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची दोन वेळा बैठक घेण्यात आली. तज्ज्ञ समितीचे अध्यक्ष खासदार धैर्यशील माने यांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठविले. पण ही बैठक झाली नाही. दरम्यानच्या काळात वरिष्ठ वकिलांशी समिती नेत्यांची ऑनलाईन संवाद झाला आहे. आता आठ वर्षांनंतर पुन्हा सुनावणी होणार आहे. त्यामुळे सीमावासीयांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

## गोविंद पानसरे हत्याप्रकरणातील आरोपी समीर गायकवाडचा हृदयविकाराने मृत्यू

मुंबई दि.२० (प्रतिनिधी)- कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या हत्या प्रकरणातील प्रमुख आरोपी समीर गायकवाड याचा आज (दि. २० जानेवारी) सकाळी हृदयविकाराने मृत्यू झाला. सांगली येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये पहाटेच्या सुमारास त्याची प्राणज्योत मालवली.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, समीर गायकवाड याला काल मध्यरात्री अचानक अस्वस्थ वाटू लागले. त्यानंतर त्याला तातडीने सांगली सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असतानाच आज सकाळी डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. मृत्यूचे कारण हृदयविकार असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी स्पष्ट केले आहे.

समीर गायकवाड हा गेल्या चार वर्षांपासून पानसरे हत्या प्रकरणात जामिनावर बाहेर होता. जामीन मिळाल्यानंतर तो सांगलीतील विकास चौक परिसरात आपल्या कुटुंबासह वास्तव्यास होता. समीर गायकवाडच्या मृत्यूची बातमी त्याच्या घरी धडकताच कुटुंबावर शोककळा पसरली.

# संभाजीनगरमध्ये भाजप कार्यकर्त्यांकडून राडा

## झेडपीसाठी फॉर्म्युला ठरताच मंत्र्यांसमोर फुल्ल ड्रामा

छत्रपती संभाजीनगर दि.२० (प्रतिनिधी)- राज्यातील महापालिका निवडणुकानंतर आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी युती आणि आघाड्यांची बोलणी सुरू आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये जिल्हा परिषद निवडणुकांसाठी भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेची अखेर युती झाली आहे. शिवसेना २५ तर भाजप २७ जागा लढवणार असल्याची घोषणा शिवसेनेकडून पालकमंत्री संजय शिरसाट तर भाजपकडून बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी घोषणा केली. मात्र, युतीच्या घोषणेनंतर संभाजीनगरमध्ये चांगलाच राडा झाल्याचं पाहायला मिळालं. भाजप कार्यकर्त्यांनी मंत्री अतुल सावे यांच्यासमोर हात जोडले, तसेच त्यांच्या गाड्याही अडवल्या. साहेब, युती तोडा असे म्हणत भाजपा कार्यकर्त्यांनी झेडपी निवडणुकांच्या युतीला थेट विरोध दर्शवला आहे.



संभाजीनगरमधील शिवसेना-भाजपची ही युती जिल्ह्यातील केवळ सात तालुक्यात (पान ४ वर)

## काँग्रेसने मुस्लिम मतांवर मक्तेदारी समजू नये; प्रकाश आंबेडकरांचा काँग्रेसवर थेट हल्ला

मुंबई दि.२० (प्रतिनिधी)- मुंबई महापालिका निवडणुकीत काँग्रेसने वंचित बहुजन आघाडीसोबत युती करत मोठ्या अपेक्षा बाळगल्या होत्या. मात्र निकालानंतर केवळ २४ जागांवर समाधान मानावं लागल्याने काँग्रेसच्या रणनीतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केलेलं एक वक्तव्य सध्या राजकीय वर्तुळात चांगलंच चर्चेत आलं आहे. काँग्रेसने मुस्लिम मतांकडे पाहण्याची भूमिका बदलली नाही, तर भविष्यात नुकसान अटळ असल्याचा थेट इशारा त्यांनी दिला आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्ट शब्दांत सांगितलं की, मुंबईत वारंवार काँग्रेसच्या नेत्यांना आम्ही सूचना दिल्या होत्या. मुस्लिम मतं ही आपली 'जहागीर' असल्यासारखी वागणूक देऊ नका, असं आम्ही सांगत होतो. मात्र काँग्रेसने आमचं म्हणणं गांभीर्याने घेतलं नाही. निवडणूक निकालानंतर वास्तव समोर आलं असून, मुस्लिम मतदारांनी काँग्रेसची साथ सोडल्याचं स्पष्ट झालं आहे. (पान ४ वर)

## भाजप स्वत:च्याच नगरसेवकांचे फोन टॅप करतंय; संजय राऊतांच्या दाव्याने भुवया उंचावल्या

मुंबई दि.२० (प्रतिनिधी)- भाजप आपल्या स्वतःच्या नगरसेवकांवर पाळत ठेवून त्यांचे फोन टॅप करत आहे, असा खळबळजनक दावा शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केलाय. यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही जोरदार टीका केलीय. 'एकनाथ शिंदे ब्लॅकमेलच्या जोरावर स्थायी समिती पदरात पाडून घेण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यांना महापौरपदापेक्षा स्थायी समितीतच अधिक रस आहे,' असे संजय राऊत यांनी म्हटले आहे. खासदार संजय राऊत यांनी माध्यमांशी संवाद साधताना विविध मुद्द्यांवर भाष्य केलंय. यावेळी त्यांना मुंबई महापौरपदासाठी कोणत्याही परिस्थितीत तडजोड करू नका, असा आदेश भाजपच्या दिल्लीतील हायकमांडकडून देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आल्याची माहिती आहे. याबाबत विचारले असता संजय राऊत म्हणाले की, 'माझ्या माहितीप्रमाणे भाजपचा महापौरपदावरील दावा सुटणार नाही. पण अशाप्रकारे ब्लॅकमेक करून काही दुसरे पदरात पाडून घेता येईल का? असा शिंदेंचा विचार आहे. त्यांना स्थायी समिती रस असतो. जिथे पैशांचे किंवा ठेकेदारीचे घोटाळे केले जातात, तिथे या लोकांना रस आहे', असे त्यांनी म्हटले आहे. भाजप आणि शिंदे गटाच्या हालचालींवर बोलताना संजय राऊत म्हणाले की, 'भाजपच्या प्रत्येक नगरसेवकावर वॉचडॉग ठेवलेले आहेत. त्या त्या भागातील कार्यकर्त्यांना नगरसेवकांवर लक्ष ठेवण्यात सांगितले आहे. ते घरी असले, तरी त्यांच्या लक्ष ठेवले जात आहे. भाजपचे नगरसेवक आणि हॉटेल मध्ये असलेल्या शिंदेंच्या नगरसेवकांचे फोन टॅप केले जात आहेत, असा दावा संजय राऊत यांनी केला. रश्मी शुक्ला नसल्या, तरी प्रक्रिया तीच आहे. भाजप आपला स्वतःच्या नगरसेवकांचे फोन टॅप करत आहे, असा दावा त्यांनी केलाय.

## ९ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

गरियाबंद दि.२० (वृत्तसंस्था)- छत्तीसगडच्या गरियाबंद जिल्ह्यात आज ९ नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर शरणागती पत्करली. त्यात ६ महिलांचाही समावेश आहे. या नऊ जणांवर एकूण ४८ लाख रुपयांची बक्षिसं ठेवण्यात आली होती. पोलीस महासंचालकांच्या आवाहनानंतर त्यांनी शरणागती पत्करली असून आज झालेल्या कार्यक्रमात या नक्षलवाद्यांनी त्यांच्याकडील अत्याधुनिक बंदुका आणि इतर शस्त्रं पोलिसांकडे सुपूर्द केली. या नक्षलवाद्यांच्या शरणागतीमुळे आता जिल्ह्यात एकही नक्षलवादी सक्रीय नसल्याची माहितीही पोलीस महासंचालकांनी दिली.

## ओबीसी चेहऱ्यांना दूर ठेवल्याने राष्ट्रवादीची माती झाली, लक्ष्मण हाकेंचा घणाघात

बीड दि.२० (प्रतिनिधी)- पुणे व पिंपरी चिंचवड महापालिकेत राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांना जबर फटका बसला. राष्ट्रवादीच्या या पराभवाचे वेगवेगळे राजकीय अन्वयार्थ लावले जात असताना ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी ओबीसी चेहऱ्यांना दूर ठेवल्यामुळे राष्ट्रवादीची माती झाल्याचा दावा केला आहे. महापालिका निवडणुकीत ओबीसी नेत्यांना दूर ठेवल्यामुळे राष्ट्रवादीचा पराभव झाला. तुम्ही ६० टक्के ओबीसींना वेड्यात काढायचे महापाप करत असाल तर तुम्हाला भोपाळाच मिळणार, असे ते म्हणालेत.

पुणे व पिंपरी महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांनी युती केली होती. आपली राजकीय तत्त्वे बाजूला सारून हे दोन्ही पक्ष याठिकाणी एकत्र आले होते. पण त्यानंतरही या दोन्ही महापालिका भाजपने आपल्या खिशात घातल्या. राष्ट्रवादीच्या या हाराकिरीची राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली असताना लक्ष्मण हाके यांनी बीडच्या शिरूर तालुक्यात आयोजित एका कार्यक्रमात उपरोक्त दावा केला आहे. ते म्हणाले, अजित पवारांची राष्ट्रवादी आता लोकांची राष्ट्रवादी राहिली नाही. हा पक्ष छगन भुजबळांच्या चेहऱ्याशिवाय निवडणुकांना सामोरा गेला. त्यामुळे त्याची माती झाली.



धनंजय मुंडेंसह अनेक ओबीसी चेहरे रणांगणात नव्हते. ओबीसीची माणसेच रणांगणात नव्हती. ६० टक्के ओबीसींना वेड्यात काढायचे महापाप करत असाल तर तुमच्या हाती भोपळाच येणार. या निवडणुकीत तुतारी नामक पक्षाला २२ नगरपालिकांत साधा भोपळाही फोडता आला नाही. हे कशाचे द्योतक आहे. भुजबळ साहेब असते, तर त्यांनी सर्वसमावेशक भूमिका घेतल्या असत्या. तुम्ही पुरोगामी आहात, तर भूमिका घ्या, असे हाके म्हणाले.

# भाजप दक्षिण महाराष्ट्रात काठावर पास!

**भाजपला** दक्षिण महाराष्ट्रात अपेक्षित यश मिळाले नाही, पण ते टिकून राहिले. यामागे मराठा आरक्षणाचा मुद्दा, स्थानिक गटबाजी आणि महाविकास आघाडीची मजबूत पकड ही प्रमुख कारणे असू शकतात, ज्यामुळे भाजपला मोठी आघाडी घेता आली नाही, अशी राजकीय विश्लेषकांची भूमिका आहे.

सांगली-मिरज-कुपवाड, कोल्हापूर आणि इचलकरंजी या महानगरपालिकांच्या निकालांनी दक्षिण महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर भारतीय जनता पक्ष (भाजप) आणि महायुतीने मिळवलेले यश कौतुकास्पद आहे. मात्र तरीही ते काठावरचे आहे. सांगली, कोल्हापूर जिल्ह्यात त्यामुळे अधिक कष्ट करावे लागतील. राज्यभरातील २९ महानगरपालिकांपैकी अनेक ठिकाणी महायुतीची सत्ता प्रस्थापित झाली असताना, दक्षिण महाराष्ट्रातील हे निकाल विशेष महत्त्वाचे ठरतात. सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेत भाजपने सर्वाधिक जागा जिंकून आपली मजबूत उपस्थिती दाखवली. ही पारंपरिकपणे काँग्रेस-प्रभावित असलेली जागा आता विकासाच्या मुद्द्यांवर भाजपच्या बाजूने झुकली आहे. पण भाजपला ३९ आणि उर्वरित पक्षांना ३९ जागा मिळाल्याने शिंदे शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीला विनंती करण्याची वेळ पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर आली आहे. ज्या तडजोडी होतील त्यानुसारच सांगलीचा निर्णय घेतील अशी सध्याची स्थिती आहे. त्यामुळे पुढचे किमान चार दिवस इथली राजकीय परिस्थिती दोलायमान असणार आहे. अर्थात सगळे विरोधक मिळून आकडा ३९ होत असल्याने त्यांना वाढीला मर्यादा आहेत. भाजप मात्र शिवसेनेच्या दोन जागा किंवा अजित पवार राष्ट्रवादीच्या १६ जागा असल्याने त्यांच्याशी हात मिळवणी करून ४० पेक्षाही भरभक्कम बहुमत मिळू शकते. मात्र त्यासाठी हे मित्रपक्ष कोणत्या अटीवर तयार होतील ते सांगता येणे अवघड आहे. अर्थात या ठिकाणी शरद पवार राष्ट्रवादीचे तीन सदस्य फोडून आपल्याकडे वळवण्यात सुद्धा भाजप लक्ष घालू शकते. काँग्रेस सोडून इतर सर्वांशी युती अशी त्यांची भूमिका आहे. त्यालाही इतर पक्ष काय साथ देतात यावर या रणनीतीचे भविष्य अवलंबून असेल. कोल्हापूर महानगरपालिकेत मात्र काँग्रेस सर्वाधिक जागा मिळवूनही महायुतीने (भाजप-शिवसेना शिंदे गट) सत्ता आपल्या हाती घेतली. कोल्हापूर ही ऐतिहासिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील जागा असून, तेथे भाजपने आपला प्रभाव वाढवणे हे मोठे यश आहे. महायुतीच्या एकत्रित प्रयत्नांमुळे विरोधकांच्या मतांची फाटाफूट झाली आणि विकासाच्या मुद्द्यांवर एकसंध मतदान झाले. शहरातील आरोग्य, शिक्षण, पर्यटन विकास आणि महिला सशक्तीकरण यांसारख्या योजनांनी मतदारांना आकर्षित केले. कोल्हापूरमध्ये काँग्रेसचे पारंपरिक बालेकिल्ले ढासळत असताना, भाजपच्या रणनीती आणि स्थानिक नेत्यांच्या मेहनतीचे हे फलित आहे.इचलकरंजी महानगरपालिकेत भाजपने स्पष्ट बहुमत मिळवले. वस्त्रोद्योगाचे हे प्रमुख केंद्र असलेल्या शहरात उद्योगांना प्रोत्साहन, रोजगार निर्मिती आणि पायाभूत सुविधा विकास यांसारख्या मुद्द्यांवर पक्षाने भर दिला. नव्याने स्थापन झालेल्या या महानगरपालिकेत पहिल्याच निवडणुकीत भाजपने एकहाती सत्ता मिळवणे हे त्यांच्या संघटनात्मक सामर्थ्याचे आणि जनतेशी थेट संवादाचे उदाहरण आहे.

या तिन्ही निकालांतून एक स्पष्ट संदेश बाहेर येतो-दक्षिण महाराष्ट्रातील जनता आता जातीय, प्रादेशिक किंवा पारंपरिक राजकारणापासून दूर जाऊन विकास, सुशासन आणि स्थिर सरकारला प्राधान्य देते. भाजपने केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांचा स्थानिक पातळीवर प्रभावी प्रचार केला. 'सबका साथ, सबका विकास' हा मंत्र येथे प्रत्यक्षात उतरला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील धोरणे-मुद्रा योजना, लाडकी बहीण योजना यांचा थेट फायदा दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी, महिला, उद्योजक आणि युवकांना झाला. त्याचे प्रतिबिंब शहरातील मतदानावरही उमटले हे विशेष. हे यश सहज आलेले नाही. स्थानिक नेते, कार्यकर्ते आणि महिला-युवा मोर्चाने घराघरात जाऊन प्रचार केला.

सोशल मीडिया, डिजिटल माध्यमे आणि ग्राउंड लेव्हलची मेहनत यामुळे विरोधकांच्या राजकारणाला जनतेने ठाम नकार दिला. अर्थात काँग्रेसने या भागात उचललेले मुद्दे भाजपला आजही आव्हान देणारे आहेत. त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे भविष्यात महागात पडू शकते. जनतेने विकासाच्या बाजूने मतदान करून एक नवा आदर्श निर्माण केला असे सरकारी पक्ष म्हणत असला तरी वास्तव काय आहे याची त्यांना पुरती जाणीव आहे, असे नाही. त्यासाठी प्रत्यक्ष काम करून दाखवावे लागेल. सत्ता पक्षात असलेल्या भाजपला ही जबाबदारी अधिक क्षमतेने पेलावी लागणार आहे.

आता प्रश्न असा आहे की, हे यश कायम ठेवण्यासाठी महायुती काय करणार? सांगली, कोल्हापूर आणि इचलकरंजीमध्ये पाणीटंचाई, रस्ते, स्वच्छता, रोजगार आणि पर्यटन विकास अशी अनेक आव्हाने आहेत. या निकालांनी दिलेल्या जबाबदारीची पूर्तता करणे हे आता महायुतीसमोरचे खरे आव्हान आहे. जर ही तिन्ही शहरे सुशासनाचे आदर्श ठरले, तर दक्षिण महाराष्ट्रात भाजपचा प्रभाव आणखी मजबूत होईल आणि आगामी सर्व निवडणुकांसाठी शुभसंकेत मिळतील. मात्र कंत्राटदारधार्जिणे नेते आणि कार्यकर्ते पूर्वीच्या पद्धतीनेच कारभार करत राहिले तर मात्र त्यांना मोठा फटका बसू शकतो.

बदलत्या पिढीतील मतदार अचानक खूप विश्वास टाकून मतदान करतो तसाच तो सत्तेपासून वंचित ठेवण्यास ही यशस्वी ठरू शकतो. त्यामुळे दक्षिण महाराष्ट्रात मिळालेले हे इशारा देणारे आहे. चांगले काम करून दाखवावे लागेल अन्यथा बदल अटळ आहे.

# स्मृतींचे राजकारण : शासन निर्णयातून वगळले गेलेले राष्ट्रपुरुष आणि अस्वस्थ करणारे वास्तव

**लोकशाही** ही केवळ निवडणुकांची प्रक्रिया नसून ती सामूहिक स्मृती, मूल्ये आणि परंपरा यांवर उभी असते. एखादा समाज कोणाला स्मरतो, कोणाला विसरतो आणि कोणाला जाणीवपूर्वक बाजूला सारतो, यावर त्या समाजाची वैचारिक दिशा ठरते. याच पार्श्वभूमीवर २०२६ मध्ये राष्ट्रपुरुष, थोर व्यक्ती यांच्या जयंती-पुण्यतिथी व राष्ट्रीय दिन साजरे करण्याबाबत काढण्यात आलेल्या शासन निर्णयातून जगतगुरू संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज आणि माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंती-पुण्यतिथी वगळल्या गेल्याची बाब केवळ प्रशासकीय नव्हे, तर गंभीर वैचारिक प्रश्न उपस्थित करणारी ठरते. हा निर्णय चुकून झाला आहे का? की तो एका ठराविक विचारसरणीचा सूचक आहे? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, संतपरंपरा आणि आधुनिक राष्ट्रनिर्मितीत योगदान देणाऱ्या नेत्यांना वगळणे हे कुठल्या भारताची कल्पना मांडते?

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज हे केवळ धार्मिक संत नव्हते; ते सामाजिक क्रांतिकारक व महाराष्ट्राच्या आत्म्याचे शिल्पकार होते. त्यांनी समाजाला भक्तीच्या नावाखाली पलायनवाद शिकवला नाही, तर समतेचा, विवेकाचा आणि मानवतेचा मार्ग दाखवला. ज्ञानेश्वरांनी अवघ्या तरुण वयात लिहिलेली ज्ञानेश्वरी ही ग्रंथरचना संस्कृतच्या मक्तेदारीला आव्हान देत मराठीला ज्ञानभाषा बनवणारी ठरली. विश्वचि माझे घरङ्क ही भूमिका मांडणारा हा संत आजही समावेशक भारताची संकल्पना सांगतो. संत तुकाराम महाराजांनी अभंगातून अन्याय, दांभिकता आणि सामाजिक विषमतेवर प्रहार केला. जाति कुळ धर्म नाही उरला, असे सांगणाऱ्या तुकारामांचे विचार आजही समाजातील भिंती तोडणारे आहेत. अशा संतांना शासन निर्णयातून वगळणे म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक मुळांनाच दुय्यम ठरवण्यासारखे आहे. महाराष्ट्राची संतपरंपरा ही कर्मकांडप्रधान नव्हे, तर मानवकेंद्रित परंपरा आहे. संतपरंपरा म्हणजे श्रद्धा नव्हे, तर सामाजिक संविधान आहे. इथे देवापेक्षा माणूस महत्त्वाचा ठरतो. त्यामुळेच फुले-शाहू-आंबेडकर यांनी संतपरंपरेला सामाजिक परिवर्तनाचा पाया मानला. अशा परंपरेतील दोन प्रमुख स्तंभ, ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांची जयंती-पुण्यतिथी शासनाच्या अधिकृत यादीतून वगळली जाणे म्हणजे समतेच्या विचारधारेला बाजूला सारण्याचा संकेत आहे का, असा प्रश्न निर्माण होतो.

दुसरीकडे, माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती-पुण्यतिथी वगळली जाणेही तितकेच चिंताजनक आहे. राजीव गांधी हे कोणत्याही पक्षापुरते मर्यादित नेते नव्हते; ते आधुनिक भारताच्या तंत्रज्ञानात्मक आणि प्रशासकीय सुधारणांचे शिल्पकार होते. पंचायतराज व्यवस्था, १८ वर्षांवरील मताधिकार, संगणकीकरण, दूरसंचार क्रांती, तरुणांना राजकारणात संधी, या सगळ्या गोष्टींनी भारताला २१व्या शतकात प्रवेश करण्यासाठी तयार केले. आज ङ्कडिजिटल इंडियाङ्कची भाषा बोलताना, त्याचे मूळ रोवणाऱ्या नेतृत्वाला विसरणे हा इतिहासाशी केलेला अन्याय ठरतो.

कोणत्या व्यक्तींच्या जयंती-पुण्यतिथी शासनस्तरावर साजऱ्या करायच्या, हा निर्णय केवळ प्रशासकीय सोयीचा नसतो. तो राज्याच्या वैचारिक भूमिकेचे प्रतिबिंब असतो. त्यामुळेच हा निर्णय तांत्रिक म्हणून दुर्लक्षित करता येत नाही. जर संतपरंपरा आणि आधुनिक राष्ट्रनिर्मितीतील नेत्यांना वगळले जात असेल, तर मग कोणत्या मूल्यांना प्राधान्य दिले जात आहे? हा प्रश्न उभा राहतो. शासन हे सर्वसमावेशक असते की निवडक स्मृतींवर उभे राहते, याची चाचणी अशाच निर्णयांतून होते.

इतिहास हा केवळ पुस्तकांत नसतो; तो स्मरणोत्सवांत, सार्वजनिक कार्यक्रमांत आणि सामूहिक साजरीकरणात जिवंत राहतो. ज्या क्षणी शासन पातळीवर एखाद्या व्यक्तीचे स्मरण थांबते, त्या क्षणी हळूहळू तिचे विचारही बाजूला पडण्याचा धोका निर्माण होतो. संत तुकाराम-ज्ञानेश्वर किंवा राजीव गांधी यांना वगळणे म्हणजे फक्त नावांची कपात नव्हे, तर विचारांची कपात आहे. महाराष्ट्र म्हणजे केवळ भौगोलिक राज्य नव्हे; तो संत-समता-सुधारणांचा प्रदेश आहे. जर याच परंपरेला शासन निर्णयातून दुय्यम स्थान दिले गेले, तर उद्या फुले, शाहू, आंबेडकर यांच्याबाबतही असेच होणार नाही, याची खात्री कोण देणार? हा प्रश्न भावनिक नसून राज्याच्या आत्म्याशी संबंधित आहे. २०२६ च्या शासन निर्णयाने एक स्पष्ट गरज अधोरेखित केली आहे, इतिहास, संस्कृती आणि राष्ट्रनिर्मिती यांचा समतोल राखणारे निर्णय घेण्याची. कोणालाही वगळून, कुणाला प्राधान्य देऊन समाज एकसंध राहत नाही.

संतपरंपरा आणि आधुनिक नेतृत्व हे विरोधी नाहीत; ते एकाच भारतीय प्रवासाचे वेगवेगळे टप्पे आहेत. त्यांना वेगळे करण्याचा प्रयत्न म्हणजे भारताच्या समावेशक आत्म्यालाच धक्का देणे होय. शासनाने हा निर्णय पुनर्विचारात घ्यावा, ही केवळ मागणी नाही; ती लोकशाहीची अपेक्षा आहे. कारण राष्ट्र उभे राहते ते केवळ भविष्यातील स्वप्नांवर नाही, तर जपलेल्या स्मृतींवर. महाराष्ट्राची ओळख ही केवळ सत्तेच्या निर्णयांनी घडलेली नाही; ती संतांच्या अभंगांनी, विचारवंतांच्या लेखणीतून आणि राष्ट्रउभारणीत योगदान देणाऱ्या नेत्यांच्या दूरदृष्टीतून घडलेली आहे. त्या स्मृती जपणे ही कोणाची मक्तेदारी नाही, तर शासनाची घटनात्मक आणि नैतिक जबाबदारी आहे.

जगतगुरू संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज आणि राजीव गांधी यांची जयंती-पुण्यतिथी शासन निर्णयातून वगळणे हा केवळ प्रशासकीय बदल नसून, सामूहिक स्मृती पुसण्याचा धोकादायक प्रयत्न ठरू शकतो. आज जर हे स्वीकारले, तर उद्या कोणाचे नाव यादीतून गळेल याची शाश्वती कोण देणार? शासनाने तात्काळ या निर्णयाचा पुनर्विचार करावा. स्मरणोत्सव ही औपचारिकता नाही; ती पिढ्यांना मूल्यांची ओळख करून देणारी शाळा असते.

संतांचा विवेक, समाजसुधारकांचा मानवतावाद आणि आधुनिक राष्ट्रनिर्मात्यांची दूरदृष्टी, या तिन्ही प्रवाहांशिवाय महाराष्ट्र अपूर्ण आहे. आज गरज आहे ती विभाजनाच्या नव्हे, तर समावेशनाच्या निर्णयांची. सत्तेच्या बदलत्या समीकरणांपेक्षा समाजाच्या दीर्घकालीन आत्म्याला प्राधान्य देण्याची. कारण स्मृती जपणारेच राष्ट्र घडवतात; आणि स्मृती पुसणारे इतिहासाच्या कठड्यावर उभे राहतात. शासनाने हे लक्षात ठेवावे की, संत, राष्ट्रपुरुष आणि विचारवंत यांना वगळून नव्हे, तर त्यांना सन्मान देऊनच लोकशाही मजबूत होते.

**- प्रवीण बागडे नागपूर**

# सीईटी नोंदणीत 'आधार'चा अडथळा नावातील विसंगतीमुळे हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला

मुंबई, दि. २० (प्रतिनिधी) - राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या सीईटी परीक्षेच्या नोंदणी प्रक्रियेत 'आधार' आणि 'अपार' आयडी सक्तीचा केल्याने विद्यार्थ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. आधार कार्ड आणि दहावी-बारावीच्या गुणपत्रिकेतील नावांमध्ये असलेल्या तफावतीमुळे नाव नोंदणीत तांत्रिक अडचणी येत असून विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने यंदापासून आधार पडताळणी अनिवार्य केली आहे. गुणपत्रिकेवरील नाव आणि आधारवरील नाव (स्पेलिंगसह) तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. नावाच्या स्पेलिंगमध्ये किरकोळ फरक, आडनाव किंवा मधल्या नावातील विसंगती आढळल्यास अर्ज नाकारले जाण्याचे संकेत देण्यात आले आहेत. यामुळे अनेक गुणवंत विद्यार्थ्यांना परीक्षेच्या संधीला मुकावे लागण्याची भीती व्यक्त होत आहे.

अनेक विद्यार्थ्यांच्या नावातील चुका या प्रशासकीय किंवा तांत्रिक त्रुटींमुळे झाल्या आहेत. आधार कार्ड दुरुस्त करण्यासाठी जन्म दाखल्याची आवश्यकता असते, मात्र ही प्रक्रिया अत्यंत संथ असल्याने नोंदणीच्या अंतिम मुदतीपूर्वी दुरुस्ती करणे अशक्य झाले आहे. विशेषतः ग्रामीण भागातील आणि पहिल्या पिढीतील शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकडे आवश्यक कागदपत्रे नसल्याने त्यांना याचा मोठा फटका बसत आहे.

अंतिम टप्प्यावर कागदपत्र पडताळणी केली जाते. मात्र सीईटी कक्षाने या नियमाबाबत अद्यापही भूमिका स्पष्ट केलेली नाही. त्यामुळे पात्र विद्यार्थ्यांवर अन्याय होण्याची शक्यता व्यक्त आहे. सीईटी कक्षाने तातडीने धोरणात्मक स्पष्टता करावी, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे. प्रतिज्ञापत्र, हमीपत्र, किंवा स्वतंत्र दुरुस्ती कालावधी उपलब्ध करून दिल्यास अनेक विद्यार्थ्यांना दिलासा मिळू शकतो, अशी भावना विद्यार्थ्यांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे सीईटी कक्षाने विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या आधारे परीक्षेची संधी देण्याबाबत विचार करावा, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली जात आहे.

'जेईई सारख्या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमध्ये नावातील किरकोळ विसंगती असतानाही विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची मुभा दिली जाते. मग राज्य सीईटी कक्ष असा कठोर नियम का लावत आहे?' असा सवाल पालकांनी उपस्थित केला आहे. नोंदणीची मुदत संपत आली असताना, प्रशासनाने यावर तातडीने तोडगा काढावा, अशी मागणी होत आहे.

# मुंबईवर नवा कारभारी

**वाट्टेल** ते करून मुंबई महापालिका काबीज करायची हा संकल्प भाजपाने साध्य केला. मुंबई महापालिकेची निवडणूक नऊ वर्षांनी झाली. गेली तीस वर्षे मुंबई महापालिकेवर असलेली ठाकरेंच्या शिवसेनेची सत्ता यंदाच्या निवडणुकीत संपुष्टात आली. मुंबई महापालिकेच्या चाव्या आता भाजपा व शिवसेना ( शिंदे ) च्या हाती आल्या आहेत. भाजपा जो ठरवेल तोच मुंबईचा महापौर असणार आहे. भारतीय जनता पक्ष स्थापन झाल्यापासून गेल्या पंचेचाळीस वर्षात या पक्षाने केंद्रात व विविध राज्यात सत्ता काबीज केली. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली केंद्रात तिसऱ्यांदा सरकार स्थापन केले.

आशिया खंडातील सर्वात मोठा पक्ष म्हणून भाजपाची नोंद झाली. राज्यातही देवेंद्र फडणवीस हे तीन वेळा मुख्यमंत्री झाले, पण देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईवर भाजपाचा महापौर कधी झाला नाही. यावर्षी झाल्ल्या महापालिका निवडणुकीने मुंबईकरांनी भाजपाला सर्वाधिक मोठा पक्ष म्हणून मान दिला, अमराठी मतदारांनी भाजपाला भरघोस मतदान केले. या पक्षाचे ८९ नगरसेवक निवडून आहे. महायुतीत असलेल्या एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे २८ नगरसेवक विजयी झाले. २२७ जागा असलेल्या सभागृहात बहुमतासाठी ११५ हा जादुई आकडा आहे. महायुतीला मुंबईकरांनी बहुमत दिल्याने आता मुंबईवर नवा कारभारी येण्याचा मार्ग मोकळा झाला. भाजपाचे सन २०१७ मधे मुंबई महापालिकेत ८२ नगरसेवक होते, अविभाजित सेनेचे ८४ होते. सन २०२६ मधे भाजपाचे ८९ निवडून आले व ठाकरेंच्या सेनेचे ६५ निवडून आले. मधल्या काळात एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली झालेल्या बंडानंतर शिवसेना फुटली. मावळत्या महापालिकेतील ठाकरेंचे ४४ व अन्य पक्षांचे मिळून एकूण ५४ नगरसेवक शिंदेंच्या शिवसेनेत गेले. सन २०१२ पासूनचे ठाकरेंच्या शिवसेनेचे ८० नगरसेवक शिंदेंकडे गेले.

ठाकरेंच्या पक्षाचे नाव शिंदेंना मिळाले. निवडणूक चिन्ह धनुष्य बाण हेही शिंदेना मिळाले. शिवसेना फोडल्याचे बक्षिस म्हणून भाजपाने




शिंदेंना अगोदर मुख्यमंत्रीपद व आता उपमुख्यमंत्रीपद दिले. सरकारमधील दहा मंत्रीपदे त्यांच्या पक्षाला दिली. ठाकरेंच्या पक्षाकडे जेमतेम वीस नगरसेवक शिल्लक राहिले. विधानसभेतही वीस आमदारच निवडून आले. तोडफफोडीनंतर ठाकरेंचा पक्ष कमकुवत झाल्यानंतरही ६५ नगरसेवक ( ठाकरे बंधुंचे मिळून ७१ ) निवडून आले हे मोठे यश म्हणावे लागेल. उलट भाजपाची संख्या ८२ वरून ८९ झाली. पण बहुमताची संख्या महायुतीकडे असल्याने मुंबई महापालिकेचा रिमोट थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच राहणार आहे.

आपली शिवसेना खरी आहे, आपणच शिवसेनाप्रमुखांच्या विचारांचे सच्चे वारसदार आहोत, निवडणूक आयोगाने आपल्याच पक्षाला शिवसेना हे नाव व धनुष्य बाण हे अधिकृत चिन्ह दिले आहे असा दावा एकनाथ शिंदे हे नेहमीच करीत असतात. महापालिका निवडणुकीत ठाकरेंचा टांगा पटली, घोडे फरार अशी अवस्था होईल असेही त्यांनी भाकीत केले होते. निकालानंतर ठाकरेंचा पक्ष संपला असे म्हणता येणार नाही. मुंबईत भाजपा नंतरचा नंबर २ चा पक्ष ठाकरेंची शिवसेना आहे. मुंबईत ९० जागा लढवणाऱ्या शिंदेची शिवसेना चौथ्या क्रमांकावर आहे. सन २०२७ मधे मनसेचे ७ नगरसेवक निवडून आले होते, यंदा ६ निवडून आले. पण यंदाच्या निवडणुकीत मनसेपेक्षा जास्त म्हणजे असदुद्दीन ओवेसी यांच्या एमआयएम चे ८ नगरसेवक निवडून आले आहेत. एमआयएमला मिळालेले यश ही काँग्रेस, सपाची चिंता वाढविणारे आहे. उबाठा सेनेचे ६५, मनसेचे ६, काँग्रेसचे २९ व राष्ट्रवादी काँग्रेस ( शप ) १ अशी बेरीज १०३ होते. एमआयएमचे ८ कुणाबरोबर जाणार हे सांगता येत नाही. अकोटमधे झालेली युती लक्षात घेता त्यांनी मुंबईत भाजपाला साथ दिल्यास आश्चर्य वाटायला नको. स्वातंत्र्यानंतर १८४७ ते १९६७ वीस वर्षे मुंबई महापालिकेवर काँग्रेसचा महापौर होता. १९९२ ते २०२२ महापालिकेवर ठाकरेंच्या शिवसेची सत्ता होती. १९९२ ते २०१२ याकाळात भाजपा ठाकरेंच्या शिवसेनेसोबत सत्तेत भागीदार होती. २०१७ नंतर भाजपाने सत्तेत सहभागी न होता पाहरेकरी म्हणून राहु असे म्हटले होते. शिंदे यांच्या बंडापूर्वी ठाकरेंच्या शिवसेनेचे जिथे महापौर होते, अशा कल्याण-डोंबिवली, नाशिक, संभाजीनगर, उल्हासनगर, अहिल्यानगर आदी ठिकाणी आता भाजपाचे महापौर दिसणार आहे. राज्यातील २९ पैकी २५ महापालिकांमधे भाजपाचे कमळ फुलले आहे. अनेक महापालिकांमधे भाजपाने एकहाती सत्ता काबीज केली आहे.

मुंबईमधे ठाकरे बंधुंनी महायुतीशी निकराने लढत दिली. पण मुंबई महानगर प्रदेशातील आठ महापालिकांमधे त्यांना कुठेच यश लाभले नाही. हिंदी सक्तिच्या विरोधात ते पाच जुलै २०२५ रोजी मुंबईत एकत्र आले होते. आम्ही एकत्र आलोय ते एकत्र राहण्यासाठी असे उध्दव सांगत होते पण राज मोकळेपणाने भूमिका मांडत नव्हते. मराठीच्या मुद्यावर आम्ही एकत्र आलो आहेत एवढेच म्हणत होते. वेगवेगळ्या निमित्ताने झालेल्या डझनभर भेटीनंतर महापालिका निवडणूक एकत्र लढवणार हे जाहीर करायला त्यांना पाच महिने लागले. ते मुंबईबाहेर कुठे गेले नाहीत. मुंबई, ठाणे, नवी मुंबईत जोडीने प्रचारही जोरदार केला नाहीत. त्याच काळात देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात ३७ जाहीर सभा, रोड शो, टीव्हीला मुलाखतींचा सपाटा चालवला होता, एकनाथ शिंदेही फिरत होते. पण ठाकरे बंधुंनी नाशिक, मुंबई व ठाणे या तीन सभांवरच समाधान मानले.

उध्दव यांनी शाखाशाखांना भेटी दिल्या हे चांगलेच झाले. पण जून २०२२ मधे सत्तेवरून पायउतार झाल्यानंतर त्यांना संघटना बांधणीचे काम करायला साडेतीन वर्षे मिळाली होती, त्यात त्यांनी काय केले ? आदित्य ठाकरेही मुंबईत फिरत नाहीत. शाखांवर जाऊन संवाद साधत नाहीत. मुंबई, ठाणे परिसरात पक्षाच्या शाखा ही शिवसेनाप्रमुखांची देणगी आहे. तोच पक्षाचा आधार आहे. पण त्याकडे पक्ष नेतृत्वाचे पूर्ण दुर्लक्ष झाले आहे. मुंबईच्या नादात ठाकरे बंधुंनी अन्य महापालिका, नगर परिषदा निवडणुकांकडे दुर्लक्ष केले, पक्षाचे कार्यकर्ते व मतदार यांना वाऱ्यावर सोडले, देवाभाऊ व भाजपाची केडर सर्वत्र दिसत होती. ठाकरे म्हणजे मराठी नाही, मुंबई नाही, महाराष्ट्र नाही असे देवेंद्र फडणवीस यांनी आठ वर्षापूर्वी मुंबईतील सोमय्या कॉलेजच्या मैदानावर झालेल्या पक्षाच्या जाहीर सभेत बजावले होते, ते आज त्यांनी खरे करून दाखवले. मुंबई व राज्यात देवाभाऊंचा ब्रँड यशस्वी ठरला.

अंबरनाथला भाजपाने सत्ता स्थापनेसाठी काँग्रेसच्या निवडून आलेल्या बारा नगरसेवकांना पावन करून पक्षात घेतले, बदलापूरला अत्याचार पिडीत मुलीच्या प्रकरणातील सहआरोपीला स्वीकृत नगरसेवक केले, तामिळनाडूच्या के. अण्णा मलाई यांनी बॉम्बे हे महाराष्ट्राचे शहर नसून आंतरराष्ट्रीय शहर असल्याचे सांगून आगीत तेल ओतले, कृपाशंकर सिंह यांनी मुंबईचा महापौर उत्तर भारतीय होऊ शकतो असे भाकीत केले, भाजपाच्या नेत्यांनीच मुंबईचा महापौर कधी खान तर कधी मराठी हिंदू होईल असे तारे तोडले. राज ठाकरेंनी गेल्या दहा वर्षात अदानी उद्योग समुहाचा राज्यात वदेशात कसा विक्रमी विस्तार झाला याचा नकाशा शिवतीर्थावरील सभेत सादर केला. पण या कश्याचा परिणाम मुंबईकरांवर झाला नाही हेच निकालाने दाखवून दिले. राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांनी ठाकरे बंधुंनी चांगली लढत दिली असा दावा केला आहे.

भाजपाने अमाप पैसे ओतून व माणसे चोरून निवडणूक जिंकली असा त्यांनी आरोप केला आहे. आमच्या उमेदवारांचे फॉर्म रद्द केले. आमचे उमेदवार, शाखाध्यक्ष, कार्यकर्ते पळवले, तुमचा पक्ष मोठा आहे ना, मग आमची माणसे का पळवता ? असा प्रश्न त्यांनी ( भाजपाला विचारला ) आहे. महायुतीकडे अपाम पैसा होता, कमळाच्या पाकिटातून पैसे वाटण्यात आले, शिंदे भाजपाच्या लोकांना व भाजपा शिंदेंच्या लोकांना पकडत होते, ते एकेका मताला पाच ते दहा हजार देत होते, आम्हाला तसे करायचे नाही, असे शर्मिला ठाकरेंनी म्हटले आहे.

**- डॉ. सुकृत खांडेकर**

## वैजापूर उपजिल्हा रुग्णालयातील सिटी स्कॅन सेंटर चालविणाऱ्या क्रष्णा डायगनोस्टिक प्रा.लि.ला दिल्लीचे राष्ट्रीय गुणवत्ता मानांकन प्रमाणपत्र



वैजापूर ता. २० (प्रतिनिधी) - येथील उपजिल्हा रुग्णालयात क्रष्णा डायगनोस्टिक प्रा.लि. द्वारे सीटी स्कॅन सेवा दिली जाते. या सेवेची तपासणी नवी दिल्ली येथील नॅशनल अक्रिडेशन बोर्ड ऑफ हॉस्पिटल(एन. ए.बी. एच,दिल्ली)कडून झालेली असून त्यांनी येथील सेवेची गुणवत्ता,रुग्ण सुरक्षा,व रुग्णाची होणारी तपासणी व रुग्णांशी आपुलकी व योग्य तपासणी व अहवाल या सर्व बाबींची तपासणी करून उप जिल्हा रुग्णालयातिल क्रष्णा डायगनोस्टिक प्रा.लि. अत्यंत दर्जेदार सेवा देत असल्याबद्धल त्यांना राष्ट्रीय स्तरावरील आरोग्य सेवे संबंधीचे उत्कृष्ट मानाकन प्रमाणपत्र दिले त्याबद्दल येथील उपजिल्हा रुग्णालयात सोमवार(ता,१९)रोजी उपजिल्हा रुग्णालय वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुधाकर मुंढे व जिल्हा आरोग्य समिती सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत यांच्या हस्ते या सेवेचे क्लस्टर मॅनेजर अन्वर पठाण,जेष्ठ कार्यकारी अधिकारी राहुल गवई व ज्ञानेश्वर भारुड तसेच अजित शेटफफळकर यांना दिल्लीचे मानांकन प्रमाणपत्र व बुके देऊन सन्मानित केले.डॉ.मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली या रुग्णालयात रुग्णांना सर्वतोपरी सेवा देण्यात येत आहेत.जिल्हा आरोग्य समिती सदस्य धोंडीराम राजपूत यांनी या सेवेचे कौतुक करून या रुग्णालयातिल सीटीस्कॅन चा लाभ शहर व तालुक्यातील रुग्णांनी घ्यावा असे आवाहन केले.या प्रसंगी रुग्ण कल्याण समिती सदस्य रणजित चव्हाण,कार्यालयीन प्रमुख किसन चौधरी, तंत्रज्ञ निलेश चाफेकर, किशोर वाघुले,श्री. शिंदे व नर्सेस व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

## वैजापूरात रंगला महिलांचा मकर संक्रातीचा ‘हळदी –कुंकू ’कार्यक्रम



वैजापूर, दि. २० (प्रतिनिधी) – येथील श्री, छत्रपती शिवाजी महाराज कॉलनी व न्यू सन्मित्र कॉलनीतील महिलांनी सोमवार (ता,१९)रोजी मकर संक्रांत निमित्त आयोजित कार्यक्रमात शहर व परिसरातील महिलांनी उस्फुर्त सहभाग घेऊन संध्याकाळच्या रम्य वातावरणात गाणी, उखानी गात एकदुसऱ्याना वाण व भेट वस्तू प्रदान करीत मांगल्याचे प्रतीक हळदी –कुंकू लावत कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

आयोजक डॉ.मंजुश्री कंताकटले, डॉ.पल्लवी पाटील, सौ,पल्लवी म्हस्के,सौ,पल्लवी राजपूत व सौ. सुनंदा राजपूत यांनी आलेल्या सर्व महिलांचे स्वागत करून भारतीय संस्कृती व मूल्यांना अनुसरून महिला वर्गांना शुभेच्छा व भेट वस्तू देत स्वागत केल. सौ, अग्रवाल, सौ,बसवेकर, सौ,पाटील, सौ.शेळके, सौ. पवार, सौ,कदम, सौ,थोट, सौ, कुंदे, डॉ,सौ. ज्योतीमोहन, डॉ. सौ.मापारी, श्रीमती शितोळे व श्रीमती कुंदे, यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. शेवटी सौ.पल्लवी राजपूत यांनी आभार मानले.

# नीती आयोगाच्या निर्यात निर्देशांकात तामिळनाडू मागे

नवी दिल्ली, दि. २० (वृत्तसंस्था) - नीती आयोगाच्या निर्यात सज्जता निर्देशांक - २०२४ मध्ये (ईपीआय) महाराष्ट्राने तामिळनाडूला मागे टाकत पहिले स्थान पटकावले आहे. देशातील पाच राज्यांत गुजरात, उत्तर प्रदेश आणि आंध्र प्रदेशचा अनुक्रमे तीन, चार आणि पाचवा क्रमांक लागतो.

केंद्र सरकारने बुधवारी जाहीर केलेल्या यादीनुसार, महाराष्ट्राने तामिळनाडूकडून पहिले स्थान संपादन केले आहे. आर्थिक वर्ष २०२२ ते २०२४ या कालावधीत केलेल्या कामगिरीवरून ही यादी तयार करण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २०२२ मध्ये तामिळनाडूचा पहिला क्रमांक होता. खालोखाल महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात आणि हरियाणाचा क्रमांक लागत होता. आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, ‘ईपीआय २०२४’ची क्रमवारी ‘ईपीआय २०२२’शी तुलना करण्यायोग्य नाही. कारण, राज्यांचे मूल्यांकन करण्याची संपूर्ण कार्यपद्धती बदलली आहे.

लहान राज्ये, ईशान्येकडील राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या क्रमवारीत, उत्तराखंडने अव्वल स्थान पटकावले आहे. त्यानंतर जम्मू आणि काश्मीर, नागालँड, दादरा आणि नगर हवेली, दमण आणि दीव, गोवा यांचा क्रमांक लागतो. निर्यात हे विकासाच्या प्रमुख चालकांपैकी एक आहे. भारताला ३० लाख कोटी डॉलरची अर्थव्यवस्था बनण्यासाठी निर्यातीचा वाटा ७.५ लाख कोटी डॉलरवर न्यावा लागेल. त्यात ज्या राज्यांची निर्यात सज्जता आहे. ज्या राज्यांची तशी क्षमता आहे, त्यांची या यादीत निवड करण्यात आल्याचे ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने राबविलेल्या विविध धोरणांमुळे निर्यातीत पहिला क्रमांक पटकावण्यात राज्य यशस्वी ठरल्याचे नीती आयोगाने म्हटले आहे. ऑटोमोबाईल्स, अभियांत्रिकी वस्तू, औषधनिर्माण, रसायने, कापड आणि आयटी सेवा यासारख्या क्षेत्रांत राज्याने धडाकेबाज कामगिरी केली आहे.

तसेच, मुंबई आणि जवाहरलाल नेहरू बंदर यासारख्या प्रमुख बंदरांच्या उपस्थितीने निर्यात वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. निर्यातदारांसाठी एकल–खिडकी प्रणाली, लॉजिस्टिक्स सुधारणा, औद्योगिक क्लस्टर्सचा विकास आणि जिल्हा–विशिष्ट उत्पादन ओळख, यासारख्या उपक्रमांमुळे राज्याची निर्यात तयारी बळकट झाल्याचे नीती आयोगाने म्हटले आहे.

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा**

## यशस्वी होण्यासाठी निरंतर वाचन आवश्यक- कुंडलिकराव अतकरे



छत्रपती संभाजीनगर, दि.२०(प्रतिनिधी)- जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी निरंतर वाचन आवश्यक असुन शासकीय विभागीय ग्रंथालयातील ग्रंथांचे दालन सर्वांसाठी खुले असुन नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा,असे आवाहन मराठी प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष कुंडलिकराव अतकरे यांनी केले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त समर्थनगर येथील शासकीय विभागीय ग्रंथालयात ग्रंथप्रदर्शनाचे कार्यक्रमप्रसंगी उदघाटक म्हणून अतकरे बोलत होते. अध्यक्षस्थानी सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह गुलाबराव मगर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे, देवगिरी कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापक श्रीमती वनिता निकम,जीवन कुलकर्णी व देवगिरी हायस्कूलचे शिक्षक कोलते उपस्थित होते. मातृभाषेचा संस्कार व्यक्तीच्या अंतःकरणात खोलवर रुजलेला असतो.आनंद व दुःखासारख्या तीव्र भावना अनुभवताना मुखातून बाहेर पडलेले उद्गार हे मातृभाषेतीलच असतात.मराठी शब्दसाठा वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांनी मराठी भाषेतील ग्रंथांचे वाचन करण्याचे आवाहन सुनील हुसे यांनी केले.

प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री संतोष जाधव यांनी केले.सुत्र संचालन व आभार प्रदर्शन तांत्रिक सहाय्यक गोविंद खेडकर यांनी केले.शिक्षकवृंद व विद्यार्थी, विभागीय ग्रंथालयाचे सभासद,वाचक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाअखेर उपस्थित विद्यार्थ्यांनी सामुहिक ग्रंथ वाचन केले. ग्रंथप्रदर्शन दि.२८ तारखे पर्यंत सर्वांसाठी खुले असुन नागरिकांनी या ग्रंथप्रदर्शनाला भेट द्यावी व शासकीय विभागीय ग्रंथालयाचे सभासद होऊन येथील वाचन सुविधेचा लाभ घेण्याविषयी आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांनी केले आहे.

## सशस्त्र सेवा ध्वजदिन निधी संकलनाचा आज प्रारंभ

छत्रपती संभाजीनगर दि. २० (प्रतिनिधी)- सशस्त्र सेवा ध्वजदिन निधी २०२५ च्या संकलनाचा शुभारंभ बुधवार दि.२१ रोजी सायं.५ वा. मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र, येथील सभागृहात होणार आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार असून जिल्ह्यातील सर्व वीरमाता, वीरपत्नी, वीरपिता, माजी सैनिक, माजी सैनिकांच्या पत्नी व अवलंबित यांनी उपस्थित रहावे,असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी श्रीमती मेजर सैय्यदा फिरासात यांनी केले आहे.

## दत्ताभाऊ पा. गोर्डे यांचा हजारो समर्थकांसह भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि. २० (प्रतिनिधी) - १९ जानेवारी रोजी दत्ताभाऊ पा. गोर्डे यांचा हजारो समर्थकांसह भारतीय जनता पार्टीत पक्षाचे मुख्य कार्यालय चिकलठाणा येथे हजारो समर्थकांसह माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दादा दानवे, माजी अर्थमंत्री खासदार भागवत कराड, फुलंब्रीचे आमदार अनुराधा चव्हाण, विधान परिषदेचे आमदार संजय केणेकर, शहराध्यक्ष किशोर शितोळे, जिल्हाध्यक्ष सुहास भाऊ शिरसाठ यांच्या उपस्थितीत मोठ्या दणक्यात प्रवेश सोहळा संपन्न झाला.

दत्ताभाऊ पा. गोर्डे यांनी पैठण नगर परिषदेच्या माध्यमातून ३ वेळा नगरसेवक पद एक वेळा नगराध्यक्ष तसेच २०१९ व २४२४ ची पैठण विधानसभा लढवली होती. त्यांना निसटता पराभव स्वीकारावा लागला होता. पैठण तालुक्यात दांडगा जनसंपर्क व जनाधार असलेला नेता अशी त्यांची ओळख आहे.

भारतीय जनता पार्टीत प्रवेश केल्यानंतर श्री दत्ताभाऊ पा गोर्डे म्हणाले की पैठण मतदारसंघात महायुतीतीलच घटकपक्ष आमच्या समोर आहे. गेल्या अनेक दिवसांपासून त्यांचे आणि आमचे युद्ध सुरू आहे. आम्हाच्या भांडणाचा फायदा दुसऱ्यालाच झाला. जनतेचे अनेक प्रश्न सोडवायचे आहेत. ब्रह्मगाव सिंचन योजनेचे पहीला टप्पा पूर्ण न होता दुसरा टप्पा सुरू झाला. अनेक गावांना पाण्याचा लाभ मिळाला नाही. त्या गावांना लाभ मिळाला पाहिजे यासह इतर अनेक थांबलेली कामे मार्गी लागले पाहिजेत. मी अनेक आंदोलने केली. परंतु यश आले नाही. त्यामुळे समर्थकांनी एक वेगळा निर्णय घेण्याचा सल्ला मला दिला. पक्ष बदला म्हणण्याची त्यांची हिम्मत होत नव्हती. परंतु सत्तामध्ये असल्याशिवाय कामे होणार नाही. त्यामुळे माझ्यावर विश्वास ठेवून काँग्रेस राष्ट्रवादी उबाठा (महाविकास आघाडीचे) पदाधिकारी व कार्यकर्ते भारतीय जनता पार्टीत पक्षप्रवेश करत आहेत. त्यांच्या विश्वासाला तडा जाणार नाही अशी माझी आपणास नम्र विनंती आहे. असे दत्ताभाऊ पा गोर्डे म्हणाले.

छत्रपती संभाजीनगर येथे दत्ताभाऊ गोर्डे यांनी जाहीर प्रवेश केला त्यांच्या बरोबर सहकारी संत एकनाथ सहकारी साखर कारखान्याची व्हाईस चेअरमन प्रल्हाद तात्या औटे, माजी पंचायत समिती सदस्य सोमनाथ जाधव, सुरेश दुबाले, आप्पासाहेब गायकवाड, अजय परळकर, सतिश पल्लोड, निवृत्ती बोबडे, किशोर दसपुते, नगरसेवक बंट्टी धुपे, माजी पोलिस निरीक्षक कल्याण चाबुकस्वार, शेखर देशमुख, प्रकाश बनसोडे, राजेंद्र पन्हाळकर, गणेश गायकवाड, अपर्णा ताई गोर्डे, निताताई कायस्थ, विवेक म्हस्के, संभाजी राजे अत्रे, गणेश औटे, संभाजी औटे, प्रविण औटे, युनुस शेख, संतोष धापटे, गौरव खीरे, सुधाकर सुलताने, विशाल क्षिरसागर, शिवाजी साबळे, महेश भोसले, रामु पिवळ, बद्रीनाथ गोर्डे, गोरख गोर्डे, शाम हंगारखे, संजय सदावर्ते, मयुर चाबुकस्वार, हसन पठाण, आप्पासाहेब गीरगे, आदींनी प्रवेश घेतला.

या कार्यक्रमास पैठण भाजपाचे तुषार भाऊ शिसोदे, सुरज लोळगे, लक्ष्मण औटे, बप्पा शेळके, विजय चाटुपळे, सतिश आहेर, पैठण तालुक्यातील आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# संपन्न अशी ‘पंजाबी भाषा’

**शिख** धर्मियांचे ९ वे गुरू ज्यांना 'हिंद दि चादर' म्हणून ओळखले जाते ते श्री गुरू तेग बहादूर साहिब यांचा ३५० वा शहिदी समागम नांदेड येथे २४ व २५ जानेवारी, २०२६ या कालावधीत होत आहे. या निमित्ताने या धर्माबाबत अल्प स्वरूपात माहिती आपणास असली पाहिजे.

गुरू-शिष्य यांची परंपरा असलेल्या या मानवतावादी धर्मात शिष्य हा महत्वाचा या अर्थाने संस्कृत भाषेतून घेतलेला हा शब्द म्हणजे शीख ( शिष्य ) होय. पंजाब प्रांतात पंजाबी भाषा प्रामुख्याने बोलली जाते. ही भाषा ज्या लिपीत आहे ती लिपी म्हणजे गुरूमुखी होय. तर पाकिस्तान विभाजनानंतर पकिस्तानात गेलेल्या पंजाब प्रांतात याच बोलीसाठी शाहमुखी लिपी वापरली जाते. भाषिक वैशिष्ट्य बघताना ही लिपी इंडो–आर्यन आहे. पंजाबी गुरूंनी स्वीकारलेली व ज्या भाषेत रचना केल्या गेल्या व ज्यात श्री गुरू ग्रंथ साहिब आहे ती गुरूमुखी लिपी ११ ते १२ व्या शतकात प्राकृत भाषेपासून आजपर्यंत आली आहे.

ਪੰਜਾਬੀ

पंजाबी

पाकिस्तानातील पंजाब प्रांतात वापरला जाणाऱ्या शाहमुखी लिपीवर लगतच्या पारशी (पर्शियन) आणि अरबी शब्दांचा प्रभाव अधिक आहेत. जगभरात असलेल्या साधारण २ कोटीहून अधिक पंजाबी भाषकांची भाषा मुळ पंजाबी हीच आहे.

देशात पंजाब राज्याची प्रमुख अशी असणाऱ्या पंजाबी भाषेला लगतच्या हरयाणा आणि दिल्ली राज्यातही अधिकृत भाषा म्हणून ओळख मिळालेली जगात कॅनडा, युनायटेड किंगडम, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, ऑस्ट्रेलिया आदी देशात पंजाबी भाषकांची संख्या अधिक आहे.

पाकिस्तानात असलेल्या पंजाब प्रांतात देखील पंजाबी ही सर्वाधिक बोलली जाणारी भाषा आहे. पंजाबमध्ये भाषिक महत्व लक्षात घेऊन भाषेच्या नावाने असणारे पंजाब विद्यापीठ आहे. याची स्थापना ३० एप्रिल, १९६९ रोजी पतियाला येथे करण्यात आली. या ठिकाणी पंजाबी भाषा संशोधन व तंत्रज्ञान शाखा आहे. या केंद्रातर्फे ऑनलाईन पंजाबी भाषेचा वापर तसेच सॉफ्टवेअर निर्मितीचे काम सातत्याने सुरू आहे. याचा माध्यमातून पंजाबी सायबर कमिटीला व सायबर क्षेत्रातील प्रत्येकाला मदत होत आहे. पंजाबी भाषेबाबतचा विश्वकोष अर्थात एपलूलश्रेशिवळर तयार करण्यात आला असून हा ऑनलाईन विश्वकोष पतियाला येथील विद्यापीठाने २०१४ साली पंजाबीपिडीया उपलब्ध करून दिला आहे. १९५४ साली पंजाबी साहित्य अकादमीची स्थापना करण्यात आली असून याला पंजाब राज्य शासन भाषक प्रस्तावासाठी मदत करीत आहे. पंजाबी साहित्य अकादमी पुरस्कार साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी १९५५ पासून सुरू करण्यात आला आहे. ज्ञानपीठ नंतर दुसऱ्या क्रमांकाचा हा पुरस्कार मानला जातो. या खेरीज कॅनडा-भारत शिक्षण संस्थेतर्फे प्रतिवर्षी ढाहान पुरस्कार देखील दिला जातो. पंजाब आणि महाराष्ट्र यांना जोडणारा महत्वाचा दुवा संत नामदेवांच्या रचना आहेत. त्यांच्या रचना शिख धर्मग्रंथात समाविष्ट आहेत. याच निमित्ताने २०१५ साली संत नामदेवांची पंजाबातील कर्मभूमी असलेल्या घुमान येथे ८८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेण्यात आले होते. संवाद हा भाषेतूनच पुढे जातो. त्याच संवादाचा सेतू नांदेड नगरीत 'हिंद-दि-चादर' श्री. गुरू तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागमातून होणार आहे. भक्ती हा मार्ग आणि त्याचसाठी भाषा हे साधन याची प्रतिती या काळात नक्की येईल.

(संदर्भ : पंजाब विद्यापीठ व विकिपिडीया)

**– प्रशांत दैठणकर** ९८२३१९९४६०

## जैनम महिला मंडळानी घेतले पालीताना तीर्थक्षेत्राचे दर्शन



छत्रपती संभाजीनगर, दि. २० (प्रतिनिधी) -जैनम महिला मंच वतीने नेहमी सामाजिक व जनकल्याणकारी उपक्रम राबविले जातात याच अंतर्गत महिलांना धार्मिक तिर्थक्षेत्रा ची माहिती व दर्शन व्हावे या निमित्ताने संभाजीनगर ते पालीतांना गुजरात तीर्थक्षेत्र येथे एक यात्रा काढण्यात आली. यात्रा २५ वर्षापर्यंत ९० वर्षापर्यंतच्या महिलांच्या सहभाग होता तसेच यामध्ये १५० महिलांनी सहभाग नोंदवला होता सुरत ते भावनगर रोप वे चा महिलांनी आनंद घेतला पालिताना तीर्थक्षेत्र येथे महिलांनी भगवंताची पूजा व आरती केली तसेच अंगलोट शंकेश्वर नीलकंठधाम कुबेरधाम स्टॅच्यू ऑफ युनिटी आधी स्थळे पाहिली यात्रा यशस्वी करण्यासाठी भारती बागरेचा संगीता संचेती ललिता साकला नंदा मुथा करुणा साहुजी कविता अजमेरा अर्चना दुगड राखी बोरा कमलाबाई आचलीया रेश्मा कोठारी आशा कासलीवाल भावना सेठीया निर्मला मुथा आदींनी परीश्रम घेतले.

यावेळी भारती बागरेचा यानी सागितलं की पालीताणा हे गुजरात राज्यातील भावनगरजवळ असलेले जैन धर्माचे एक पवित्र तीर्थक्षेत्र आहे, जे शत्रुंजय पर्वतावर वसलेले आहे आणि येथे ९०० हून अधिक सुंदर संगमरवरी मंदिरे आहेत, ज्यात आदिनाथ (ऋषभदेव) आणि इतर तीर्थंकरांना समर्पित मंदिरे आहेत; हे ठिकाण जगातील एकमेव शाकाहारी शहर म्हणूनही ओळखले जाते आणि जैन भाविकांसाठी अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. अशी माहिती नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यानी दिली.

## संत श्रेष्ठ गजानन महाराज (शेगाव) संगीतमय कथा व चरित्र पारायण, ध्वज स्तंभ पूजन उत्साहात

वैजापूर, दि. २० (प्रतिनिधी) – येथील श्री. सुंदर गणपती मंदिर भक्त परिवार यांच्या वतीने सालाबादप्रमाणे याही १२व्या वर्षी पुढील महिन्यात शेगावीचे संत श्रेष्ठ गजानन महाराज यांची संगीतमय कथा, व श्री गजानन महाराज, त्रिदिवशीय चरित्र पारायण सोहळा आरंभ होणार आहे. त्यानिमित्त सोमवार (ता.१९) रोजी विधिवत ध्वजस्तंभ पूजा पांच जोडप्याच्या वतीने सम्पन्न झाली.आरंभी श्री गजानन महाराज प्रतिमा पूजन व दिप प्रज्वलन काशिनाथ आगाज व जेष्ठ नागरिक धोंडीराम सिंह राजपूत यांच्या हस्ते झाले.

पांच जोडपी श्याम आगाज व सौ.सुशीला आगाज, कपिल आसर व सौ. सपना आसर, धनंजय अभंग व सौ. अर्चना अभंग, प्रसाद डांगरे व सौ. प्राजक्ता डांगरे, जितेंद्र पवार व सौ. वैशाली पवार, व उमेश नाईकवाडी यांनी पूजा केली. कुलकर्णी गुरुजी यांनी विधिवत ध्वज स्तंभ पूजन केले. या प्रसंगी काशिनाथ शेठ आगाज, संतोष शेठ बोथरा, नगरसेविका सौ.जयश्री श्रावण चौधरी,



अजय भुजबळ, महेश डांगरे, राजू पुणे, श्याम पवार, गणेश धुमाळ, गोटीराम बिडवे, सुनील बसवेकर, सागर चौतमल,आदित्य वडनेरे, कुणाल जगताप, सिद्धेश्वर धुमाळ, अरुण आंबेकर, विलास रामैय्या, शैलेश पोंदे, गिरीश चापानेरकर , सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत, दिनेश वैष्णव व श्री. गजानन महाराज भक्त परिवार मोठ्या संख्येने उपस्थितीत होते. श्री गजानन महाराज संगीत कथाकार आहेत वाशीम येथील टी. व्ही. कथाकार हभप जय महाराज सरनाईक मंडळाचे हे बारावे वर्षे आहे. काशिनाथ आगाज, श्रावण चौधरी व संतोष बोथरा हे सालाबादप्रमाणे याही वर्षी पुढाकार घेत आहेत.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# शहीदी समागम कार्यक्रम जागतिक स्तरावर नेण्यासाठी समन्वयाने काम करा-राज्यमंत्री माधुरी मिसाळ

## 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाची आढावा बैठक संपन्न

नांदेड दि.२० (प्रतिनिधी)- 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचा कार्यक्रम नांदेडपुरता मर्यादित न राहता जागतिक स्तरावर पोहोचावा, यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने, काटेकोर नियोजनासह जबाबदारीने काम करावे, असे स्पष्ट निर्देश नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.

नांदेड येथे होणाऱ्या या शताब्दी वर्ष कार्यक्रमाच्या आयोजनाचा राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दूरदृष्य प्रणालिद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्स) सविस्तर आढावा घेतला. या बैठकीत संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, राज्यस्तरीय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, समिती अध्यक्ष डॉ. विजय सतबीर सिंग, विभागीय माहिती उपसंचालक, जिल्हा माहिती अधिकारी तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते.

राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या की, कार्यक्रमस्थळी पुरेसे पिण्याचे पाणी, स्वच्छ व पर्याप्त शौचालय व्यवस्था सुनिश्चित करण्यात यावी. कार्यक्रमाची प्रचार–प्रसिद्धी व्यापक प्रमाणात करण्यात यावी. स्थानिक स्तरावर होणाऱ्या उपक्रमांमध्ये लोकप्रतिनिधींचा सक्रिय सहभाग आवश्यक असून सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया व मुद्रित माध्यमांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती केली जावी, असेही त्यांनी



निर्देश दिले.

विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती व प्रेरणा निर्माण व्हावी, यासाठी शाळा स्तरावर निबंध व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करून त्याची माहिती पोर्टल वर अपलोड करावी. तसेच सिनेमागृहांमध्ये भक्तिगीत प्रसारित करणे, प्रत्येक जिल्ह्यात होर्डिंग्ज लावून कार्यक्रमाचा संदेश पोहोचवणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुख्य कार्यक्रमास महिला, ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग व्यक्तींना सहज सहभागी होता यावे, यासाठी पार्किंग क्षेत्रापासून कार्यक्रमस्थळापर्यंत योग्य वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्याचे निर्देशही राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे दि. २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी असरजन परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ५२ एकर मैदानावर भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांच्यासह अनेक मंत्री, संत-महात्मे उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली.

कार्यक्रमाच्या अनुषंगाने मैदानावर युद्धपातळीवर काम सुरू असून तयारी अंतिम टप्प्यात आहे. भाविकांच्या वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करण्यात आली असून, मैदानालगत दोन भव्य टेन्ट सिटी उभारण्यात आल्या आहेत. एका टेन्ट सिटीत सुमारे १४ हजार भाविकांची निवास क्षमता असून, यासोबतच शहरातील मंगल कार्यालये व शाळांमध्येही निवास व्यवस्था करण्यात आली आहे. या सर्व सुविधांसाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

कार्यक्रमस्थळी स्वच्छता, स्वयंसेवक व्यवस्था, विविध प्रकारचे मोफत सेवा स्टॉल्स, तसेच मोठ्या प्रमाणात वैद्यकीय सेवा नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये ५० हजार नेत्र तपासणी व विशेष कर्करोग तपासणी स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत.

भाविकांसाठी भव्य लंगर व्यवस्था करण्यात आली असून, याचा लाभ सुमारे १० लाख भाविकांना घेता येणार आहे. निवास, भोजन, वाहतूक, आरोग्य व सुरक्षा याबाबत सर्व विभाग समन्वयाने काम करीत असल्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले.

या कार्यक्रमाच्या अनुषंगाने आतापर्यंत करण्यात आलेल्या व पुढील कालावधीत राबविण्यात येणाऱ्या प्रचार–प्रसिद्धी उपक्रमांची माहितीही यावेळी देण्यात आली.

# सेवा स्टॉलच्या माध्यमातून सेवेची सुवर्णसंधी-जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## 'हिंद दी चादर' शहीदी समागमानिमित्त सेवाभावी संस्था व नागरिकांना आवाहन

नांदेड दि.२० (प्रतिनिधी)- नांदेड येथे दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी 'हिंद दी चादर' अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त भव्य विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी देश-विदेशातून तसेच राज्यभरातून मोठ्या प्रमाणावर भाविक भक्त नांदेड येथे उपस्थित राहणार आहेत.

या पार्श्वभूमीवर, कार्यक्रमासाठी येणाऱ्या भाविकांच्या सेवेसाठी शहरातील विविध ठिकाणी सेवा स्टॉल्सची उभारणी करण्यात येत आहे. या सेवा स्टॉल्सवर भाविकांसाठी चहा, पाणी, नाश्ता, फलाहार आदी सुविधा निःशुल्क स्वरूपात उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या सेवाकार्यासाठी विविध सेवाभावी संस्था, व्यापारी व व्यावसायिक आस्थापना, उद्योजक, शासकीय कार्यालये, बँकिंग क्षेत्र तसेच सेवा देण्याची इच्छा असलेल्या नागरिकांनी नोंदणी केली आहे. अधिकाधिक भाविकांना उत्तम सेवा देता यावी यासाठी आणखी जास्तीत जास्त संस्था व नागरिकांनी पुढे यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

सेवा हीच खरी श्रद्धांजली असून, सेवा स्टॉलच्या माध्यमातून समाजसेवेची संधी सर्वांनी साधावी, असे जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले. सेवा स्टॉल्सच्या नोंदणीसाठी इच्छुकांनी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे तहसीलदार महसूल यांचेशी संपर्क साधावा, असेही त्यांनी कळविले आहे.

### हिंद दी चादर गुरु तेग बहादुर यांचा ३५० वा शहीदी समागम

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला पूर्वतयारीचा आढावा

छत्रपती संभाजीनगर दि.२० (प्रतिनिधी)- नांदेड येथे येत्या २४ व २५ जानेवारी रोजी होऊ घातलेल्या हिंद दी चादर गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम निमित्त आयोजीत सोहळ्यास जिल्ह्यातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. त्यासाठी जिल्ह्यामार्फत करावयाच्या पूर्वतयारीचा आढावा आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी घेतला.



निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपायुक्त लखिचंद चव्हाण, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ,अन्न निरीक्षक वर्षा रोडे, गुरुद्वारा संस्थांशी संबंधित नंदकुमार अहुजा, गुरुज्ञान सिद्ध रणवीरसिंह , नरेंद्रसिंग तारासिंग जबिंदा, हरिंदरसिंग, जगदेव सिंग, रमेश वधवा, राज्य समिती सदस्य उत्तम चव्हाण, डॉ. सुदाम चव्हाण, करतार राठोड, कुलदीपसिंग छाबडा,सरदार हरिसिंग आदी मान्यवर उपस्थित होते.

शहीदी समागम वर्षानिमित्त राज्य, देश तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरून श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांना मानणारे लाखो भाविक नांदेडमध्ये येत्या २४ व २५ जानेवारी रोजी येणार आहेत. या कार्यक्रमाच्या निमित्ताने शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, भगत नामदेव व उदासीन असे नऊ समाज-संप्रदाय एकत्र येणार आहेत. श्री गुरु तेग बहादुर यांच्या त्याग, बलिदान व मानवतेसाठी दिलेल्या शहीदीचा इतिहास देश-विदेशात पोहोचवणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या कार्यक्रमासाठी जाणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी https://gurutegbahadurshahidi.com या संकेतस्थळावर रस्ते, रेल्वे, बस, वाहतूक व्यवस्था तसेच कार्यक्रमासंदर्भातील सविस्तर माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून या कार्यक्रमासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी महानगरपालिका, शाळा-महाविद्यालये, पोलीस यंत्रणा व परिवहन विभागाने समन्वयाने सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. सुरक्षेच्या दृष्टीने नियोजन करावे. जिल्ह्यातून जाणाऱ्या भाविकांच्या वाहनांची नोंद घेणे. त्यांच्याशी समन्वय साधून नांदेड येथील वाहनतळ व अन्य अनुषंगिक व्यवस्थांबाबत त्यांना अवगत करणे. या आयोजनासाठी योगदान देऊ इच्छिणाऱ्या व्यक्ति, संस्थांशी समन्वय साधणे, या आयोजनाबाबत तसेच या इतिहासाबाबत जनजागृती करणे यासंदर्भात नियोजन करण्यात यावे,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. या कार्यक्रमात सर्व समाजातील लोकांचा सहभाग घ्यावा,असे आवाहनही जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले. जिल्ह्यातील माध्यमिक व प्राथमिक विद्यालये व महाविद्यालयांनी दैनंदिन उपक्रम राबवून जनजागृती करावी,असे आवाहनही त्यांनी केले.

# प्रॉम्पट व ऑनलाईन पेमेंट करणाऱ्या वीजग्राहकांना पावणेसहा कोटींची सवलत

छत्रपती संभाजीनगर दि.२० (प्रतिनिधी)- महावितरणने ग्राहकांसाठी सर्व सेवा डिजिटल पद्धतीने उपलब्ध करून दिलेल्या आहेत. या डिजिटल सेवांचा वापर वाढावा, यासाठी ग्राहकांना प्रोत्साहन दिले जात आहे. चालू आर्थिक वर्षात महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील वीजग्राहकांनी डिजिटल पर्याय अवलंबून व तत्पर वीजबिल भरणा करून पावणेसहा कोटी रुपयांची सवलत मिळवली आहे.

वीजग्राहकांनी बिलाच्या तारखेच्या सात दिवसांच्या आत ते भरल्यास एकूण रकमेच्या (कर व शुल्क वगळून) जवळपास १ टक्का तत्पर बिल भरणा सवलत, डिजिटल पद्धतीने (नेट बँकिंग, क्रेडिट/डेबिट/कॅश कार्ड, मोबाईल वॉलेट/यूपीआय इ. वापरून) वीजबिल भरल्यास एकूण रकमेच्या (कर व शुल्क वगळून) ०.२५ टक्के डिजिटल भरणा सवलत व गो ग्रीन सेवेचा पर्याय स्वीकारून छापील बिलाऐवजी ई-मेलवर वीजबिल घेतल्यास दरमहा १० रुपये सवलत दिली जाते.

छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील वीजग्राहकांनी चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते डिसेंबर-२०२५ या कालावधीत तत्पर वीजबिल भरणा सवलत ४ कोटी २४ लाख ३६ हजार, डिजिटल बिल भरणा सवलत १ कोटी २१ लाख ८२ हजार व गो ग्रीन पर्याय निवडण्याची सवलत २८ लाख २ हजार अशी एकूण ५ कोटी ७४ लाख २० हजार रुपयांची सवलत मिळवली आहे. त्यात छत्रपती संभाजीनगर शहर मंडलातील ग्राहकांनी अनुक्रमे २ कोटी ६४ लाख ८ हजार, ७४ लाख ३६ हजार व १४ लाख २४ हजार अशी एकूण ३ कोटी ५२ लाख ६८ हजार सवलत मिळवली आहे. छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडलातील ग्राहकांनी अनुक्रमे १ कोटी १८ लाख १ हजार, ३४ लाख ४० हजार व ८ लाख ९३ हजार अशी एकूण १ कोटी ६१ लाख ३४ हजार रुपये सवलत मिळवली आहे, तर जालना मंडलातील ग्राहकांनी अनुक्रमे ४२ लाख २७ हजार, १३ लाख ६ हजार व ४ लाख ८५ हजार सवलत मिळवली आहे.

महावितरणने ग्राहकांना वीज बिल पाहणे व भरणे, तक्रार नोंदवणे, नवीन वीजजोडणी अर्ज, वीजभार व नाव बदलणे इ. सर्व सेवा महावितरण वेबसाईट, महावितरण ग्राहक मोबाईल ॲपद्वारे डिजिटल माध्यमातून सुरक्षित, जलद व पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्यामुळे ग्राहकांच्या वेळ, श्रम व पैशांची बचत झाली आहे. त्यामुळे ग्राहकांनी या सेवांचा लाभ घेऊन नियमित व वेळेत ऑनलाईन वीजबिल भरावे तसेच वीजबिलांसाठी गो ग्रीन पर्याय स्वीकारावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

# संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेचा मासिक मेळावा उत्साहात

पुणे दि.२० (प्रतिनिधी)- पिंपळे सौदागर येथील श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेचा मासिक मेळावा नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला. मकर संक्रांतीचे औचित्य साधून या मेळाव्यात तिळगुळ आणि महिलांसाठी हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याशिवाय राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती या कार्यक्रमात साजरी करण्यात आली. कुणाल आयकॉन रोडवरील स्व. बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर विलास जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रमेश भट यांनी केले. संस्थेच्या उपाध्यक्षा स्नेहा




चिंचवडकर यांनी सुत्रसंचलन केले. यावेळी उपस्थित महिलांनी एकमेकींना संक्रांतीचे वाण दिले. अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# छोट्यांनी अनुभवले आनंदनगरीत व्यवहारीक व आर्थिक व्यवहाराचे ज्ञान

वैजापूर दि.२० (प्रतिनिधी)- शालेय ज्ञाना सोबत विद्यार्थ्यांना आनंदनगरीतून आर्थिक, व्यवहारिक व सामाजिकतेचे मिळणारे अनुभव त्यांना स्वावलंबी बनविण्यास उपयुक्त ठरू शकतात असे प्रतिपादन जेष्ठ समाजसेवक व माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी मंगळवार (ता.२०) रोजी विद्याधन इंग्लिश स्कुलच्या विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या 'आनंद नगरी'उदघाटन प्रसंगीं काढले. ते पुढे म्हणाले की, भविष्यात विद्यार्थी स्वावलंबी होणे गरजेचे आहे.या आनंदनगरीत विविध खाद्य पदार्थचे ५०स्टॉल होते. जवळ पास आठ ते दहा हजार रुपयांची उलाढाल या आनंद नगरीत झाली. सर्व व्यवहार विद्यार्थ्यांनीच केले. संस्थेच्या अध्यक्षा आशा गायके व सचिव दिगंबर गायके




सह शिक्षकवृंद,पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्राचार्या भारती पाटील, शांतीलाल कोठाळे यांच्या समवेत शिक्षक राहुल जाधव, गोविंदा त्रिभुवन, महेश दिवेकर, मोहिनी मापारी, गौरी थोरे, विद्या शेलार, योगिता पाटणे, तुषार तुपे, दीपाली भुजाडे, पूनम भागवत, सर्वश्री धामणे,गायकवाड, जाखडे, शिंनगारे,कासार यांनी या आनंदनगरीचे नियोजन केले होते.

या प्रसंगी मकरंद कुलकर्णी,बाबासाहेब धुमाळ,अशोक कराळे, दीपक बरकसे,शैलेश खैरमोडे,बाळासाहेब सरोदे,किरणसिंह राजपूत,विशाल त्रिभुवन, राजेंद्र जानराव, विशाल त्रिभुवन,यांची उपस्थिती होती.

(पान १ वरुन)

## संभाजीनगरमध्ये भाजप...

असणार आहे. मात्र, सोयगाव आणि सिल्लोड या दोन तालुक्यातील ११ ठिकाणी युती न करता शिवसेना आणि भाजप हे एकमेकांच्या विरोधात निवडणूक लढवणार आहेत. महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये इच्छुकांचा जसा राडा झाला होता तसाच राडा आज जिल्हा परिषद निवडणुकीच्या युतीच्या घोषणेनंतर त्याच ठिकाणी झाला. वैजापूर तालुक्यातील भाजपचे भाजपचे काही पदाधिकारी आणि कार्यकर्ते हे थेट मंत्री अतुल सावे आणि भाजपचे आमदार खासदार यांना घेराव घालण्याचा प्रयत्न केला. त्यासोबतच त्यांची गाडीही अडवली. त्यामुळे काही काळ राडा आणि गोंधळ पाहायला मिळाला. अखेर, पोलिसांच्या बंदोबस्तात मंत्री अतुल सावे निघून गेले.

वैजापूर तालुक्यातील आठ जागांपैकी केवळ तीन जागा भाजपला मिळाले आहेत. त्यामुळे, भाजप कार्यकर्त्यांनी रोष व्यक्त केला, अनेक वर्षे आम्ही निवडणुकीची तयारी करीत होतो. मात्र, ती जागा शिवसेनेला गेली आणि तिथं भाजप नेत्यांना शिव्या देणारा व्यक्ती उमेदवार असणार आहे. त्यामुळं आता आम्ही त्यांच्यासाठी काम करायचं का? असा प्रश्न भाजप कार्यकर्त्यांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या निवडणुकीत जसा गोंधळ छत्रपती संभाजीनगरमध्ये झाला होता, तीच गत आता जिल्हा परिषद निवडणुकीच्या अर्ज भरण्यापासून झाली आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ६३ जिल्हा परिषद गटांपैकी २५ जागा या शिवसेना लढणार आणि २७ जागा भाजप लढणार आहे. सोयगाव आणि सिल्लोड तालुक्यातील ११ ठिकाणी युती झाली नाही. त्या ठिकाणी भाजप आणि शिवसेना हे एकमेकांच्या विरोधात निवडणूक लढवणार.सिल्लोड आणि सोयगाव या दोन तालुक्यातील ११ जागांवर युती करणार नाही. मी स्वतंत्र लढणार असं शिवसेनेचे आमदार अब्दुल सत्तार यांनी सांगितले. त्यामुळे, तिथं युती झाली नाही, अशी माहिती शिवसेना नेते तथा मंत्री संजय शिरसाट यांनी दिली.

## काँग्रेसने मुस्लिम मतांवर मक्तेदारी...

दुसरीकडे हिंदू मतदार आधीच काँग्रेसपासून दुरावलेला आहे, असंही आंबेडकरांनी नमूद केलं.

काँग्रेसच्या नगरसेवकांच्या विजयावर भाष्य करताना आंबेडकरांनी एक महत्त्वाचा दावा केला. काँग्रेसचे जे नगरसेवक निवडून आले आहेत, ते पक्षाच्या बळावर नाहीत, तर त्यांच्या वैयक्तिक ताकदीवर, कामावर आणि प्रतिभेवर निवडून आले आहेत, असं सांगत त्यांनी अप्रत्यक्षपणे काँग्रेसच्या संघटनात्मक ताकदीवर प्रश्न उपस्थित केला. युती असूनही काँग्रेसने वंचितचा पुरेसा उपयोग करून घेतला नाही, असा आरोपही त्यांनी केला.


## नगर परिषद वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

वैजापूर तहसील कार्यालयाजवळ, स्टेशन रोड, वैजापूर,
ता. वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर पिन कोड : ४२३७०१
**दूरध्वनी क्रमांकः ०२४३६-२९५०३६ ई-मेलः** npvaijapur@gmail.com

जा.क्र./नपवै/कावी/बांध/२०२६/२७९६ दि. २०/०१/२०२६

### निविदा सूचना

वैजापूर नगर परिषद वैजापूर हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाची खालील दर्शविलेल्या कामासाठी अनुभवी योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत गुत्तेदाराकडून/एजन्सी धारकाकडून निविदा मागवीत आहे. कोर निविदा फॉर्म सुटीचे दिवस वगळून दि. २८/०१/२०२६ पर्यंत कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत खालील प्रमाणे निश्चित किंमत जमा केल्यानंतर नगर परिषद कार्यालयात बांधकाम विभागात विकत मिळतील

१) गुत्तेदाराने मोहोरबंध निविदा दोन लिफाफा पद्धतीत मुख्याधिकारी, नगर परिषद वैजापूर यांच्याकडे दि.२९/०१/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजे पर्यंत सादर कराव्यात. २) निविदा सोबत बयाना रक्कम रोख जमा करणे आवश्यक आहे. ३) धनादेश किंवा दर्शनी हुंडी स्वीकारली जाणार नाही. ४) जमा केलेल्या बायाना रकमेचा पावती क्रमांक सिलबंद पाकिटावर नमूद करावा. ५) बयाना रक्कमे शिवाय निविदा स्विकारली जाणार नाही. ६) प्राप्त आलेल्या निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी ठीक ५.०० वा. मा. मुख्याधिकारी यांच्या दालनात उपस्थिता समक्ष उघडण्यात येतिल. ७) मान्य निविदा धारकाच्या बिलातून अनामत, आयकर, GST, कामगार उपकर, रॉयलटी इत्यादीची नियमानुसार कपात करण्यात येईल. ८) इतर अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळून न.प. बांधकाम विभागात विनामूल्य पहावयास मिळतील. ९) खालील कामासाठी (Price Escal Action) Clause लागू राहणार नाही. १०) भारत सरकार राजपत्र दि. ०८/०१/२०२१ नुसार EPF रेजिस्ट्रेशन बंधनकारक राहील. ११) कोणतीही निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार न.प. ने राखून ठेवला आहे.

**कामाचा तपशील खालील प्रमाणे.**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | बयाना रक्कम | टेंडर फोम फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | भटक्या प्राण्यांना निवारा (सेल्टर) तयार करणे. | ४२१३०६ | ८४२६ | ५०० | १५ दिवस |
| २ | शहरातील विविध मतदान केंद्र दुरुस्ती करणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | २७०९९७ | ५४२० | ५०० | १५ दिवस |

**स्वाक्षरीत**
**(ए.एम. सोनवणे)**
**कनिष्ठ अभियंता**
**नगर परिषद वैजापूर**

**स्वाक्षरीत**
**(ए.बी.सोनवणे)**
**नगर अभियंता**
**नगर परिषद वैजापूर**

**स्वाक्षरीत**
**(बि.यु.बिघोत (राजपूत))**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद वैजापूर**